स.फौ.ख.क्र.२०२/२०२३
निशाणी क्रमांक–

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २५१ नुसार आरोपीस सांगावयाचा अपराधाचा तपशील

## सावंतवाडी येथील न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग यांचे न्यायालयात

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | – | ०७/०६/२०२३ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक | – | १६/०६/२०२३ |
| ३. | फिर्यादीचे नांव, त्याच्या आई व वडिलांचे नांव, त्यांचे वय व निवासस्थान इत्यादी | – | फिरोज अहमद खान<br>वय–३८ वर्षे, धंदा–ड्राव्हिंग<br>रा.रेल्वे स्टेशनसमोर, कुडाळ<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग. |
| ४. | आरोपीचे नांव, त्याच्या आई व वडिलांचे नांव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इत्यादी | – | लियाकत सादिक सय्यद<br>वय सु.४४ वर्षे,धंदा–मालवाहतूक<br>रा.गुढीपूर, पिंगुळी<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग. |
| ५. | अपराधाचा तपशील | – | |

तुम्ही फिर्यादीस कायदेशीर देणे असलेल्या रकमेच्या परतफेडीसाठी तुमचे खाते असलेल्या 'स्टेट बँक, शाखा कुडाळ या बँकेचा खाते क्र.३११८९२५८६५८ दि.१३/०५/२०२३ रोजीचा रक्कम रु.१,२५,०००/– (रक्कम रु.एक लाख पंचवीस हजार मात्र) चा धनादेश क्रमांक ८२९३४० फिर्यादीस दिला. फिर्यादीने सदरचा धनादेश वटण्यासाठी दि.१५/०५/२०२३ रोजी त्याचे खाते असलेल्या 'बँक ऑफ बडोदा शाखा कुडाळ येथे जमा केला असता सदरचा धनादेश **''फंडस इनसफिसीएंट''** अशा शेऱ्यासह दि.१६/०५/२०२३ रोजीच्या रिटर्न मेमोसह परत मिळाला. त्यानंतर फिर्यादीने दि.२२/०५/२०२३ रोजी तुम्हास वकीलांमार्फत पोस्टाने धनादेशाच्या रक्कमेची मागणी

**स.फौ.ख.क्र.२०२/२०२३**
**निशाणी क्रमांक–**

नोटीस पाठविली. ती नोटीस तुम्हास दिनांक २३/०५/२०२३ रोजी कायदेशीरदृष्टया मिळून देखील तुम्ही फिर्यादीस देय रकमेबाबत कोणतीही तजवीज केली नाही. याप्रकारे तुम्ही मुदतीत फिर्यादीच्या मागणीप्रमाणे धनादेशाची रक्कम फिर्यादीस दिली नाही व त्याद्वारे तुम्ही भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ च्या कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केलेला आहे.

६. अपराधाचे प्रतिकथन.

**प्र. १.** तुला फिर्यादीची प्रत मिळाली काय ?

**उत्तर** होय.

**प्र. २.** तुला अपराधाचा तपशील समजला का ?

**उत्तर** होय

**प्र. ३** तुला अपराध कबुल आहे काय ?

**उत्तर** नाही.

---------------
आरोपीची सही

समक्ष

Kulkarni 29/07/2024
(जी.ए.कुलकर्णी)
न्यायदंडाधिकारी वर्ग–१,कुडाळ.

दिनांकः–२९/०७/२०२४.